# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

मुख्य कार्यालयः- मेन रोड, लातूर

स्थापना - 25 ऑक्टोबर - 2011

फोन 02382, 242803,246075, फॅक्स – 02382, 246077, ई.मेल- mclatur@yahoo.co.in


जा.क्र./लाशमनपा/भांडार/ /2025-26

दिनांकः 30/01/2025

प्रति,

**संगणक विभाग प्रमुख**

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

**विषयः**-लातूर शहर महानगरपालिका, लातूर करिता प्रशासकीय बैठका व इतर सर्व आवश्यक विविध बैठकांसाठी चहा, पाणी, नाष्टा व जेवणाची दर ई-कोटेकोटेशनद्वारे बंददरपत्रक मागविण्यात येत असल्याने मनपाच्या वेबसाईटवर अॅपलोड करण्यांत यावे.

याद्वारे आपणास कळविण्यांत येते की, लातूर शहर महानगरपालिका, लातूर करिता प्रशासकीय बैठका व इतर सर्व आवश्यक बैठकांसाठी चहा, पाणी, नाष्टा व जेवणाची दर ई-कोटेकोटेशनद्वारे बंददरपत्रक मागविण्यात येत असल्याने मनपाच्या वेबसाईटवर अॅपलोड करण्यांत यावे.

तरी आपण दि.30/01/2026 ते 06/02/26 दुपारी 1.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत लातूर शहर महानगरपालिका लातूर येथे आपले दर बंद लिफाफ्यामध्ये 1) GST प्रमाणपत्र 2) पॅनकार्डसह 3) शॉपॅक्ट लायसन्ससह, निविदा फी पावती व अनामत रक्कम भरुन लिफाफा क्र. 1 व 2 मध्ये बंददरपत्रक सादर करावेत.

कोटेशन दि. 06/02/2026 रोजी दुपारी 1.30 वा. फोडण्यात येवून मान्य असलेल्या एजन्सिला संबंधीत कामाचे /साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देण्यांत येईल. आदेश दिल्यानंतर मालाचा पुरवठा करावा लागेल.

**अटी व शर्तीः-**

1) साहित्याचे दर हे सर्व शासकीय करासह भरावे.
2) शम्पल साहित्य मुदतीत प्राप्त न झालेले अथवा अटी असलेले कोटेशन स्विकारले जाणार नाही.
3) कोटेशन दाखल करतेवेळी, शॉपअॅक्ट नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व जी.एस.टी. प्रमाणपत्र जोडावे.
4) सिलबंद लिफाफ्यावर विभागाचा संदर्भ लिहावा.
5) बिलाची अदाई लाशमनपा फंडातील उपलब्ध निधीनुसार केली जाईल.
6) निविदा शुल्क रु. 1000/- व अनामत रक्कम 10,000/- (अंदाजित रक्कम रु. 100,000/-, 1% प्रमाणे.)
7) कोटेशन मंजूर करणे अथवा नाकारणेचे अधिकार मा.आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

**अति.आयुक्त,**

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

## लातूर शहर महानगरपालिका, लातूर
## ई-कोटेशन निवीदा सुचना
## अल्पोहार, चहा, कॉफी, ज्युस व भोजन व्यवस्था करणेबाबत.
## :-अटी व शर्ती: -

---

साल सन 2025-26 या कालावधीत लातूर शहर महानगरपालिका विविध समारंभाकरिता, अनुभवी व सक्षम कंत्राटदाराकडून याद्वारे अल्पोहार, चहा, कॉफी, ज्युस,पाणी व भोजन पुरवठा करण्यासाठी ई- कोटेशन निविदा मागविण्यात येत आहे.

1. इच्छुक कंत्राटरदारांनी दिनांक 06 फेब्रुवारी 2026 दुपारी 1.00 वाजेपर्यंत कोटेशन दरपत्रक अटी व शर्तीचे पालन करून भरता येईल व दिनांक 06 फेब्रुवारी 2026 ते दुपारी 1.30 वाजेपर्यंत उघडण्यात येईल.
2. ई-कोटेशन निविदा दोन लिफाफे पद्धतीने भरण्यांत यावी.
3. लिफाफा अ (तांत्रिक) मधील नमूद कागदपत्राची पूर्तता करावी. पूर्तता न केल्यास दराचा लिफाफा उघडण्यांत येणार नाही.
4. कोटेशनधारकांनी निवेदत कोणत्याही अटीचा समावेश केले असेल ती निविदा अपात्र ठेवण्यात येईल.
5. यशस्वी कोटेशन /निविदाधारकास मा. आयुक्त/ मा. अतिरिक्त आयुक्त/ मा.उपायुक्त यानी केलेले प्राधिकृत अधिकारी यांच्या सूचनेनुसार सूचित करण्यात येणा-या ठिकाणी वेळत अल्पोहार, चहा, कॉफी, ज्युस, पाणी व भोजनेपैकी सर्व काही सुविधा पुरविण्यास बंधनकारक राहील.
6. यशस्वी निविदाधारकास/ कोटेशनधारकांनी अल्पोपार चहा, कॉफी, ज्युस व भोजन तयार करताना रंग मसाले खाद्यतेल व इतर साहित्य मान्यता प्रास प्रमाणे दर्जाचे वापरणे अनिवार्य आहे. अल्पोहार, चहा, कॉफी, ज्युस व भोजनानंतर कोणासही अन्न व कोणत्याही त्रास झाल्यास त्यामुळे होणा-या आर्थिक/ व्यावसायिक नुकसानीस मा. आयुक्त लातूर शहर महापालिका जबाबदार राहणार नाहीत. तसेच संबंधित बाधीत व्यक्तींना द्यावयाची सर्व प्रकारची भरपाई ठेकेदारांनीच देणे बंधनकारक राहील.
7. चहा, कॉपी, ज्युसमध्ये साखरेसह विना साखरेचा समावेश असेल.
8. अल्पोहारामध्ये ठेकेदाराने पोहे, उपीट, उपमा, बटाटा वडा सांबर, मेदुवडा, चटणी व सांबर पुरी भाजी तसेच उपवासासाठी साबुदाणावडे, चटणी, नायलॉन चिवडा, शाबुदाण्याची खिचडी, दही, चटणी इत्यादी पैकी माननीय आयुक्त, माननीय अति. आयुक्त व माननीय उपायुक्त यांनी अधिक प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या सूचनानुसार नमूद ठिकाणी वेळीत अंन्य पदार्थ पुरवठा करणे बंधनकारक आहे.
9. भोजनामध्ये एक कडधान्याची उसळ, पोळ्या, किमान दोन भाज्या, साधा मसाले भात, वरण, पापड, चटणी, लोणचे व एक गोड पदार्थ कांदा, लिंबू पुरवणी बंधनकारक आहे. भोजनाबद्दल, चहा,